महाराष्ट्र शासन
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४
E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com
फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य विभाग /२०२३-२४/ 4489 दिनांक- ०५.०८.२०२४

## महत्वाचे परिपत्रक

प्रति,

१. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित
कला,वाणिज्य,विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

विषय :- उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अमंलबजावणी बाबत
संदर्भ :- १. क्रमांक उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमोशि/ ईमेल ,दि. १ ऑगस्ट २०२४

शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ व शासन निर्णय दि. ८.७.२०२४ अन्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त विगरव्यावसायिक व व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेशीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येत आहे.

यावावत संचालनालयाच्या संदर्भाधिन दि. २९ जुलै, २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अंधिपत्याखालील सर्व शासकीय, अशामकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य / संचालक आणि कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांना सदरहू योजनेच्या प्रभावी अंमलवजावणी करणेकरीता सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच शासन परिपत्रक दि. १९ जुलै, २०२४ अन्वये, सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने विगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्या वेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच, शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. प्रवेशावेळी संस्थांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, सदर रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करणे वावत निर्देश दिलेले आहेत. परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यानुसार संचालनालयाच्या

संदर्भाधिन दि. २२.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित महाविद्यालये व विद्यापीठे यांना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

सदरहू योजनेचा सर्व पात्र विद्यार्थीनींना लाभ मिळणेकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी गुरुवार, दि. २५ जुलै, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. WEBINAR द्वारे ऑनलाईन पध्दतीने राज्यातील सर्व विद्यार्थीनी, शिक्षण संस्था, महाविद्यालये तसेच अकृषी विद्यापीठे यांच्यासमवेत ऑनलाईन पध्दतीने संवाद साधून सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजवणी व कार्यपध्दतीबाबत तपशीलवार विद्यार्थी, पालक, संस्थाचालक यांच्या प्रश्नांचे निराकरण केले आहे. या WEBINAR मध्ये देखील शासन निर्देशाप्रमाणे प्रवेश घेतेवेळी विद्यार्थीनींकडून शिक्षण शुल्क आकारण्यात येऊ नये याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. तसेच या योजनासंबंधी विद्यार्थीनी, पालक, संस्था यांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण होणेकरीता प्रश्नोत्तरे हे उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे शासन व संचालनालयाद्वारे वेळोवेळी मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात स्पष्ट निर्देश दिलेले असताना काही संस्था / महाविद्यालये पात्र लाभार्थी विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळो शिक्षण शुल्क घेत असल्याबाबतच्या तक्रारी शासन व संचालनालय स्तरावर प्राप्त होत आहेत. सदरची बाब ही अत्यंत गंभीर असून शासन निर्देशाचे उल्लंघन करणारी आहे. तरी शासन निर्देशाचे अनुपालन न करणाऱ्या संस्था / महाविद्यालयाच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची वेळ येऊ नये, याबाबत सर्व संस्था/ महाविद्यालये यांनी दक्षता घ्यावी.

D.D. Kanadkar

**विभागीय सहसंचालक**
**(उच्च. शिक्षण.)**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

**प्रत- मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१**